P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41

प्रेसनोट

दिनांक – ०१/१०/२०२६

दि. ३०/०९/२०२६ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- रावेत ४४७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०८(३)(४),१४०(३), ११५(२), ३५१ (२)(३) ३(५) प्रमाणे भादवि कलम ३८५ ३८७ ३६५ ३२३ ५०६ ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०९/२०२६ रोजी कन्नु की चाय रेस्टॉरंट जवळ रावेत पासुन विश्रांतवाडी येथ्ने दुपारी ०३.३० पर्यत

गुन्हा दाखल :- दि ३०/०९/२०२६ रोजी ०४.४४ वा

फिर्यादी :- सुरज नाथाजी पाटील, वय. ३१ वर्षे, धंदा. अर्किटेक, रा. सिल्हर गार्डनिया सोसायटी, आय १२०२ बी आर टी रोड, रावेत, ता. हवेली, जि. पुणे. मुळ मु. पो. पिपळे, ता.पन्हाळा

आरोपी :- १) शिवाकांत तिवारी रा.के व्हिला सोसायटी किवळे ता.हवेली जि.पुणे
२) मुस्सा गौस शेख रा.देहुरोड बाजार देहुरोड ता.हवेली जि.पुणे.
३) शिवाकांत तिवारी यांचा चालक नाव व पत्ता माहित नाही
आरोपी क्रं.२ ताब्यात आहे.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी ा फिर्यादी हे व्यवसायाने आर्किटेक्चर असुन विकासनगर किवळे येथील जागा विकसीत करण्या करीता संबधीत जागेचे शेतकरी यांचेशी ओळख होती सदर जागा विकसीत करण्या करीता यातील आरोपी क्रं.०१ व जागा मालक यांचे मध्ये डेव्हलोपमेंट ॲग्रीमेंट करण्याचे काम फिर्यादी यांचे मार्फतीने चालु होते.दरम्यानच्या काळात फिर्यादी व जागा मालक यांना आरोपी क्रं.०१ यांनी काही रक्कम सदर कामा बाबत अदा केली आहे.काही कारणास्तव डेव्हलोपमेंट ॲग्रीमेंट करण्यास विलंब होत असल्याने याबाबत आरोपी क्रं.०१ यांनी यापुर्वी दमदाटी केली होती.दि.२९/०९/२०२६ रोजी आरोपी क्रं.०१ याने दुपारी १२/३० वा सुमारास फोनद्वारे फिर्यादीस कन्नु की चाय रेस्टॉरंट रावेत येथे बोलावुन डेव्हलोपमेंट ॲग्रीमेंट करीता वेळ का लागत आहे अशी दमदाटी करुन आरोपी क्रं.०१ यांनी आरोपी क्रं.०२ व ०३ यांचे मदतीने आरोपीचे टोयोटा हाय रायडर गाडी क्रमांक. UP ३२ QS ९०३० मध्ये बळजबरीने बसवुन फिर्यादीस हाताने मारहान करुन फिर्यादकडुन जबरदस्तीने त्यांचे एच डी एफ सी बँकेचे कोरे चेक वर सही घेवुन दि. २९/०९/२०२६ चे दुपारी ३/३० वा सुमारास विश्रांतवाडी पुणे येथे सोडले

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि टार्फे ७२७६८६४४८४

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ४२७/२०२६ भा.न्या. स. कलम ३१८(४) १४०(३) प्रमाणे.भादवि कलम – ४२०,३६५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक १७/०४/२०२६ रोजी दु .१२.२२ वाचे सुमारास पवना हॉस्पीटल सोमाटणे फाटा ता.मावळ जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि ३०/०९/२०२६ वेळ १६/०१

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी महिला पोलीस हवालदार,ब.नं. ४३१९ पोलीस मुख्यालय,पिंपरी चिंचवड, सध्या रा. लिटील अर्थ सी.१५/९०५ किवळे,जि. पुणे,

आरोपी :- १) नितीन बाबुराव दळवी वय ५५ वर्षे रा. भांगरवाडी लोणावळा ता. मावळ जि.पुणे
२) संकेत जयवंत खानेकर वय ३० वर्षे रा. जांभुळ ता. मावळ जि.पुणे
३) संतोष शंकर गुडपाळे वय ५२ वर्षे रा. खोपोली जि.रायगड
४) महिला आरोपी वय ४५ वर्षे रा. कोथुर्णे ता. मावळ जि.पुणे

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादीचे दिर आरोपी क्र १ व आरोपी क्र २ ते ३ यांच्या मदतीने संगनमत करून फिर्यादीच्या पतीच्या आजारपणाचा व त्यांची असमर्थ शारीरिक स्थितीचा फायदा घेऊन फिर्यादीच्या पतीचे नावावरील मालमत्ता हडपण्याचा उद्देष मनात धरून त्यांना पवना हॉस्पीटल सोमाटणे फाटा ता. मावळ जि.पुणे येथुन जबरदस्तीने डीस्चार्ज करून घेउन फिर्यादीचे पती सचिन बाबुराव दळवी नावावरील मौजे कोथुर्णे येथील गट नं. १९१/१ व गट नं. १९१/३ या मालमत्तेबाबतचे बक्षीसपत्र तयार करून घेतले व त्याची नोंदणी वडगाव मावळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात करून घेतली. सदर बक्षीसपत्र फिर्यादीचे पतीने स्वतःच्या स्वतंत्र व

स्वेच्छेने केलेले नसून, दिर आरोपी क्र १ यांनी फिर्यादीच्या पतीवर दबाव आणून, त्यांना भीती दाखवून व त्यांच्या आजारपणाचा फायदा घेऊन तसेच फिर्यादीच्या पतीने सदर मालमत्ता आरोपी क्र १ यांना स्वेच्छेने बक्षीस म्हणून देण्याचा निर्णय घेतला होता किंवा नाही, याची मला कोणतीही माहिती न देता सदर मालमत्तेचे आम्ही वारसदार आहेत हे माहीत असुन सुध्दा फिर्यादीची किंवा फिर्यादीचे मुलीची कोणतीही परवानगी न घेता सदरचे बक्षीसपत्र बनवुन सदरची मालमत्ता स्वतःचे नावावर करून घेउन फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ७०२०७३२०३४

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण उत्तर ९२१/२०२६ बी.एन.एस. कलम ३१८(४),२८७,३(५) सह जिवनावश्यक वस्तुकायदा १९५५ चेकलम ३,७ सह (पुरवठा व वितरणनियमन) आदेश २००० चेकलम ३,४.५.६.७. प्रमाणे भादवि कलम ४२०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/०९/२०२६ रोजी १८.५० वा चे सुमारास मौजे बिरदवाडीगावचे हद्दित आकाश पवार याचे भाडयाचेखोलीमध्ये बिरदवडीता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दिनांक ३०/०९/२०२६ रोजी २३/४६ वा

फिर्यादी :- बाळु दुंदा मराडे, वय ४० वर्षे पोलीस अंमलदार २७३० नेमचाकण उत्तर पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस

आरोपी :- १) रवि किसन माडेकर रा. आंबेठाण ता.खेड जि.पुणे २) विधीसंघर्ष बालक-

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपी नं १ व २ हा व्यवसायीक वापराचे गॅसचे टाकी मधुन लाल रंगाचे लहान टाकीमध्ये काळया रंगाचे नोझल पाईप असे एकुण १०,५००/-रुपयांचे साहीत्य वापरुन स्वताचे फयद्यासाठी लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना घरगुती वापराचे ज्वालाग्राही गॅस सिलेंडर मधुन लहान गॅस टाकीत भरीत असताना मिळुन आला असुन त्याने गॅस या जिवनावश्यक वस्तुबाबत शासन व ग्राहकांची फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि बुरुड ९७६३६६९२७४ पोउपनि बंडे ८६२४०५०१२९

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ८१५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम-भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (सी), ६६ (डी). भादवि कलम ४२० ४०६ ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ता.२९/०९/२०२६ रोजी सांयकाळी ०६/०० वाजण्याचे ते तारीख २९/०९/२०२६ पर्यन्त राञी ०८/००वाजण्याचे दरम्यान ऑनलाईन सीएमआर पीजी गवारेवाडी माण हिंजवडी फेज नंबर ०३ माण ता.मुळशी जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि ३०/०९/२०२६ रोजी २०.५९ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय २७ वर्षे,धंदा- नोकरी स.रा.सीएमआर पीजी गवारेवाडी माण हिंजवडी फेज नंबर ०३ माण ता.मुळशी जि.पुणे मुळ रा.अमनापुर ता.पलुस जि.सांगली

आरोपी :- अज्ञात इसम नांव व पत्ता माहीती नाही

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी इंन्स्ट्राग्राम पाहता असताना फिर्यादीला त्यांवर आयडि manish_saree किंवा @manish_saree_9 या आयडिवर रिल्स पाहता असताना त्यामध्ये मनिष मॅनफॅक्चर या कपडयाची दुकानांची रिल्स होती. त्यामध्ये साडयाची माहीती सांगत असताना त्यांवरील एक साडी फिर्यादी यांना पसंत पडल्याने त्या साडीच्या चौकशी करण्या करिता त्यांवर असलेल्या व्हॉट्रसॲप मोबाईल नंबर ८३०६०६७६९८ यांवर सुरुवातील व्हॉट्सॲप एसएमएस केल्यावर पैसे पाठविल्यानंतर व्हॉट्रसॲप कॉलव्दारे फोन करुन फिर्यादीला सांगितले कि, मी तुम्हांला तुम्ही मला पाठविलेली रक्कम रुपपये १,१९,२०९.११/- रुपये इतकी रक्कम पाठवितो. तुम्ही मला आता १६,७०६/-रुपये इतकी रक्कम जीएसटि भरावी लागले त्यासाठी तुम्ही १६,७०६/-रुपये पाठवा असे सांगतिले असता तेव्हा फिर्यादीची खाञी झाली कि, अज्ञात इसम नांव व पत्ता माहीत नाही यांने फिर्यादीने इंन्ट्राग्रामवर पाहिलेले साडी हि पाठविण्याच्या बहाणाने फिर्यादीकडुन वरिलप्रमाणे पैसे घेवुन ते परत देतो असे सांगुन पैसे घेवुन फिर्यादीची १,१९,२०९.११/- रुपये इतकी रक्कमेची फसवणुक केली आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पाटील

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी८१६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८(४) ,३(५)सह आय टी अक्ट कलम ६६(डी) प्रमाणे भादवि कलम ४२० ३४

गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	एप्रिल २०२६ मध्ये (तारीख माहीत नाही) बिल्डींग नं.४३ भगवान नगर भूमकर चौक वाकड पूणे फिर्यादी यांचे रहाते घरी
गुन्हा दाखल	:-	दि ३०/०९/२०२६ रोजी २३.०० वा
फिर्यादी	:-	महिला फिर्यादी वय-२३ वर्षे धंदा-नोकरी रा.बिल्डींग नं.४३ भगवान नगर भूमकर चौक वाकड पूणे
आरोपी	:-	१) सूनिल राठोड वय- ३७ वषै ,) महिला आरोपी वय-३२ वर्षे दोघेही रा.दत्तवाडी ,नेरे ता.मुळशी जि.पूणे,
तपशिल	:-	नमुद ता वेळीव ठिकाणी यातील आरोपी नं १ व २ यांनी फिर्यादीस क्रिप्टो करन्सी पैसे गुंतवणूक करण्यास सांगून त्याचे दुप्पट पैसे मिळतील असे आश्वासन देवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून फिर्यादीकडून दिनांक-१४ एप्रिल २०२६ ते दिनांक १८ मे २०२६ दरम्यान एकूण- २,७३,४८२/- रूपये तसेच फिर्यादी यांच्या परिचयाचे श्री.भागवत तुळशीराम घोडके व कु.अभिषेक भागवत घोडके यांचे एकूण ५,४२,४२४/-(पाच लाख बेचाळीस हजार चारशे चोविस रूपये) अशी एकूण ८,१५,९०६(आठ लाख पंधरा हजार नवशे सहा रुपये) रक्कम वैयक्तिक अकाउंटवर व स्कॅनरवर ऑनलाईन स्वरूपात घेवून आर्थिक फसवणूक केली आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि पवार ९९७५४९०११५

०६.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	वाकड ६४७/२०२६, बी.एन.एस.कलम- ११५(२), ११८(१), १८९(२), १९१(१), १९०, ३५१(२)(३), ३५२ प्रमाणे भादवी कलम ३२३ ३२६१४२ १४६
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.३०/०९/२०२६ रोजी रात्रौ ०१.३० वा ते रात्रौ ०१.४५ वा. चे सुमारास जगताप डेअरी ते काळेवाडी फाटयाकडे जाणारे रोडवर पकवान हॉटेल शेजारी जगताप डेअरी जवळ, पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि. ३०/०९/२०२६ रोजी २०/४८वा
फिर्यादी	:-	हेमंत अनंता काळोखे, वय- २८ वर्षे, धंदा- जेसीबी व्यवसाय, रा. भुगांव ता. मुळशी जि.पुणे
आरोपी	:-	१)मोहम्मद नफिस रशिद कुरेशी, वय ४० वर्षे, रा. प्लॅट नं. ३०४, ३रा मजला, शहर हाइट्स बिल्डिंग, लिसान हॉस्पिटलजवळ, काळेवाडी फाटा, पुणे. २)हमजा नफिसकुरेशी, वय १८ वर्षे २ महिने, रा. प्लॅट नं. ३०४, ३रा मजला, शहर हाइट्स बिल्डिंग, लिसान हॉस्पिटलजवळ, काळेवाडी फाटा, पुणे. ३)शहाबान आब्दुल माजीद शेख, वय २२ वर्षे, रा. जगताप डेअरी, पकवान हॉटेलशेजारी, डिसेंट फर्नीचर दुकानामध्ये, पुणे. व इतर इसम आरोपी अटक आहे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे चुलत चुलते यांचे नावे असलेली मारुती सुझुकीची कंपनी ब्रेजा कार फिर्यादीचे चुलते अविनाश चालवत होते त्यांच्या बाजुला त्यांचा मित्र नितेश विरु हिरेगौडा व फिर्यादी पाठीमागे बसलेलो होतो व आम्ही पकवान हॉटेलच्या शेजारी जगताप डेअरी जवळ फिर्यादीची कारने जात असतांना अचानक डिसेंट फर्नीचरचा मालक नफिस कुरेशी याचा मुलगा आरोपी व इतर दोघे चेतक स्कुटी वरुन तिघेजन आडवे आल्याने त्यांना फिर्यादीचे चुलते यांनी कारचा हॉर्न दिल्याने याचा त्यांना राग आल्याने त्यांनी फिर्यादीला शिवीगाळी केल्याने फिर्यादी व आरोपीत आपसात बाचाबाची झाले सदर वेळी पांढ-या रंगाची फोर्च्युनर गाडी घेवुन आमचे समोर येवुन थांबली त्यातुन आरोनी क्र१ व २ व इतर असलेले पाच जन खाली उतरले त्यांच्या हातात हॉकीस्टीक व लाकडाचे दांडक्याने व लाथा बुक्यांने आम्हांला मारहाण केले सदर दुखापतीत फिर्यादी यांचे चुलत चुलते अविनाश व त्यांचा मित्र नितेश यांना व फिर्यादीस दुखापत झालेली आहे.
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि घुगे ,७९७२११००४४ सपोनि झिंजुर्के ९९७०१९७१८७

०७.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	निगडी ८४७/२०२६ भा. न्या.संहिता कलम ११७,११५(२),३३३, ३५२,३५१(२) ,३(५)प्रमाणे (भा.द.वि. कलम३२५,३२३,५०४,५०६,४५२,३४)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.२९/०९/२०२६ रोजीदुपारी ०४/०० वा चे सुमारास माझा भाऊ विनोदकरजखेडे रा. घरनं २४, सेनं २१, श्रीगुरूदत्तधाम हौसींग सोसा.अमृता शाळेजवळ यमुनानगरनिगडी पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	ता. ३०/०९/२०२६ रोजी २२/४० वा
फिर्यादी	:-	विशाल विलास करजखेडे वय-३७ वर्षे, धंदा- नोकरी, रा.ए-१, ३०६,मँजीस्टीकरिदमकाऊंटी हांडेवाडी रोड हडपसर पुणे
आरोपी	:-	१.श्रीकांत सनमानेरा. सृष्टीकनस्ट्रक्शन स्वागत हॉटेलजवळ मांगडेवाडीकात्रज पुणे २. महिला आरोपी
तपशिल	:-	नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ विनोद करजखेडे हे घरी असताना आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादीच्या घरी येवून फिर्यादीचे पत्नीचे पर पुरूषा बरोबर असलेले फोटो बाबत फिर्यादी ने विचारून माहिती सांगत नसल्याने तीला कायदेशीर नोटीस वकीला मार्फत पाठविली याचा राग मनात राग धरून फिर्यादीला व फिर्यादीचा भाऊ विनोद करजखेडे यांस हाताने मारहाण करून जोराने लाथा मारून मन गटाजवळ फँक्चर होणेस कारणीभुत होवून फिर्यादीच्या भावास कमरे जवळ,डावे पायाचे गुडघ्यास मुका मार

करून आरोपी क्र २ हिने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि साबळे ८०८००१६५९९ पो हवा १४७१ पोंदकुले ८१०८८२६४४४

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ८७४/२०२६ भा.न्या.सं.कलम १०६(१), २८१ मोटार वाहन अधिनियम कलम १८४, ११९/१७७प्रमाणे. भादवि कलम ३०४(अ) २७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/०६/२०२६ रोजी १२/३० वा सुमारास पिंपरी ओव्हर ब्रीजवर येथे

गुन्हा दाखल :- दि.३०/०९/२०२६ रोजी १८.१७ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय- ४३ वर्षे, धंदा- गृहीणी, रा. मिरकुटे बिल्डींगजवळ, आळंदी रोड ,पांडव नगर, शास्त्री चौक, भोसरी, पुणे

आरोपी :- अमोल प्रल्हाद उमाळे, वय ३६ वर्षे, धंदा इलेक्ट्रीक काम, रा. साई पा सी ४३, एच ब्लॉक, गीता माता हायस्कुल जवळ, इंदीरानगर, चिंचवड,

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी व मयत नामे अनिल पांडुरंग डांगे, वय ५५ वर्षे असे आरोपी यांची मोटार सायकल गाडी क्र. एम.एच. १४ डी ई ८६७४ वरुन पिंपरी मार्केट येथुन सामान घेवुन येत असताना अमोल प्रल्हाद उमाळे याने रस्त्याच्या विशिष्ठ परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगईने, अविचाराने गाडी चालवुन मयत नामे अनिल पांडुरंग डांगे यांचे गंभीर दुखापतीस तसेच मृत्युस तसेच वाहनाच्या नुकसानीस कारणीभूत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि इंगळे ९८६०२५५८१७ सपोनि कदम ९०२१२९५२४४

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- संत तुकारामनगर ४९९/२०२६भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) भादवि कलम३८०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सकाळी ०८/४० वा. ते ९/१५ वा. च्या दरम्यान रुम नंबर २०७, दुसरा मजला, आध्या बॉईज हॉस्टेल, फायरब्रिगेड चौक, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे

गुन्हा दाखल :- दिनांक ३०/०९/२०२६ रोजी २२/०७ वा

फिर्यादी :- कु.लक्ष्य केशवप्रताप सिंह, वय.२० वर्षे, धंदा.शिक्षण, सध्या रा. रुम नंबर २०७, दुसरा मजला, आध्या बॉईज हॉस्टेल, फायरब्रिगेड चौक, संत तुकारामनगर, पिंपरी,

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारखेस वेळी ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे मित्र यांचे एकुण ८०,०००/- रुपये किंमतीचे ०३ लॅपटॉप कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या संमतीशिवाय, स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी लबाडीच्या इरादयाने दरवाजा उघडा असताना त्यातुन प्रवेश करुन चोरुन नेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पाटील ९१५८९१९३१९

१०

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ८४६/२०२६ बी एन एस ३०५(अ) प्रमाणे. भादवी कलम ३८०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०९/२०२६ रोजी १८/०० वा.चे सुमारास आमचे राहते घर .फ्लॅट नं.१२,शिवम बिल्डींग, सेंट्रल एक्साईस कॉलनी, से.नं. २८, प्राधिकरण,पुणे येथे राहते घरात

गुन्हा दाखल :- दि. ३०/०९/२०२६. रोजी २२/१९ वा.

फिर्यादी :- विनोद मलप्पा नेवडे वय २८ वर्षे, धंदानोकरी, रा.फ्लॅट नं.१२, शिवम बिल्डींग, सेंट्रल एक्साईस कॉलनी, से.नं. २८, प्राधिकरण,पुणे

आरोपी :- रोहित रमेश पाटील वय ३५ वर्षे,धंदा नोकरी,रा.चिंतामणीचौक,चिंचवड

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादच्या राहते घरी येथे फिर्यादीचे दाजी आरोपी यांनी येवुन घरात प्रवेश करुन फिर्यादीच्या कपाटातुन रोख रक्कम व सोन्याचे दागिने असे एकुण २,५७,६५६ /- रु.कि.अं.मुदेमाल चोरुन नेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- १.पोउपआ आटोळे २.सपोआ ढोले ३. वपोनि बनसोडे ४.पोनि गोंधे ५. पोउपनि